अंगणवाडी कार्यकर्त्यांमुळे मुलांची भक्कम पायाभरणी

◆ जव्हार (प्रतिनिधी) :

प्रारंभिक बालविकास मजबूत करण्याच्या उद्देशाने, सेसमी वर्कशॉप इंडिया ट्रस्टने इंडूसइंड बँकेच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत पालघर येथे जिल्हास्तरीय सन्मान व उत्सव कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात जव्हार ब्लॉकमधील अंगणवाडी कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मानातून योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीत अंगणवाडी कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित झाली.

या कार्यक्रमात सरकारी अधिकारी आणि तळागाळातील कार्यकर्ते सहभागी झाले होते. सर्वांनी मिळून मूलभूत साक्षरता व अंकज्ञान वाढवणे तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, निपुण भारत अभियान आणि एकात्मिक बालविकास सेवा योजना (ICDS) यांसारख्या सरकारी उपक्रमांद्वारे प्रारंभिक शिक्षण मजबूत करण्याची वचनबद्धता व्यक्त केली.

हा प्रकल्प २०२३ पासून सुरू आहे. "लर्न. प्ले. ग्रो." (महाराष्ट्रासाठी मराठी आवृत्ती) हा तीन वर्षांचा कार्यक्रम आहे, जो सेसमी वर्कशॉप इंडिया इंडूसइंड बँकेच्या सहकार्याने आणि जिल्हा प्रशासनासोबत राबवत आहे. सध्या हा कार्यक्रम ३४४ अंगणवाडी केंद्रे आणि २२७ प्राथमिक शाळांमध्ये चालू आहे, ज्यामुळे जव्हार ब्लॉकमधील ३ ते ८ वयोगटातील मुलांना फायदा होत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश सरकारी व्यवस्थेत राहून प्रारंभिक शिक्षण मजबूत करणे हा आहे. याअंतर्गत अंगणवाडी कार्यकर्ते आणि शिक्षकांना खेळाधारित व बालकेंद्रित शिक्षण पद्धती, शैक्षणिक साहित्य आणि नियमित मार्गदर्शन दिले जाते. यामुळे मुलांची शाळेसाठी तयारी आणि शिकण्याचे परिणाम सुधारतात.

कार्यक्रमादरम्यान अंगणवाडी कार्यकर्त्यांना विविध श्रेणींमध्ये सन्मानित करण्यात आले. जसे: सर्वोत्तम प्रारंभिक बाल शिक्षण व संगोपन (ECCE) कार्यकर्ता, नाविन्यपूर्ण खेळाधारित शिक्षक, मूलभूत साक्षरता व अंकज्ञान प्रोत्साहक आणि समर्पित अंगणवाडी कार्यकर्ता.

या प्रसंगी सोनाली खान, व्यवस्थापकीय संचालक, सेसमी वर्कशॉप इंडिया ट्रस्ट म्हणाल्या, "सेसमी वर्कशॉप इंडियामध्ये आमचे ध्येय मुलांना अधिक समजूतदार, सक्षम आणि संवेदनशील बनवणे आहे. ही प्रक्रिया बालपणाच्या सुरुवातीपासूनच सुरू होते. पालघर सारख्या जिल्ह्यात काम करताना आम्हाला हा उद्देश अधिक प्रभावीपणे साध्य करता येतो.

कार्यक्रमात उपस्थित व्यंकटराव हुंडेकर म्हणाले, 'लर्न. प्ले. ग्रो.' उपक्रमातून हे स्पष्ट होते की सरकार, समाज आणि खासगी क्षेत्र एकत्र आल्यास मोठा बदल घडवता येतो. याचे खरे श्रेय आमच्या अंगणवाडी कार्यकर्त्यांना जाते. त्यांनी हा उपक्रम पुढे नेण्यासाठी सहकार्य करावे, जेणेकरून पालघरमधील प्रत्येक मुलाला चांगले प्रारंभिक शिक्षण मिळेल.'

वाडा औद्योगिक वसाहतीमधील अनधिकृत बांधकामांना चाप

जिल्हाधिकाऱ्यांकडून कारवाईचे निर्देश

◆ पालघर (प्रतिनिधी) :

वाडा तालुक्यात विविध कंपन्यांकडून होत असलेल्या अनधिकृत बांधकामांच्या तक्रारी आणि औद्योगिक बांधकाम परवानगी प्रक्रियेत उद्योजकांना भेडसावणाऱ्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने निर्णायक पावले उचलली आहेत. जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी या संदर्भात योग्य कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हा नियोजन समिती कार्यालय, पालघर येथे गुरुवारी झालेल्या बैठकीत उद्योग सुलभतेसाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.

बैठकीस अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, सहायक संचालक नगर रचना भाग्यश्री ढवळसंक, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र) रणजित देसाई, उद्योग विभागाचे सरव्यवस्थापक उपेंद्र सांगळे, सहायक वनसंरक्षक डेमरे तसेच तहसीलदार सचिन भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. वाडा तालुक्यातील अनेक उद्योजकांनीही सहभाग नोंदवला.

जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ अन्वये अकृषिक वापर परवानगीसंबंधी कलमे रद्द करण्यात आली असून औद्योगिक बांधकामासाठी आता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत संबंधित प्राधिकरणाकडे थेट अर्ज करता येणार आहे. यामुळे परवानगी प्रक्रियेत गती येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, एकरकमी रूपांतरण अधिमूल्य भरल्यानंतर पुन्हा अधिमूल्य भरण्याची आवश्यकता नसल्याची सुधारणा स्पष्ट करण्यात आली. नव्या धोरणानुसार विविध विभागांकडून आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे एका महिन्याच्या आत देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

उद्योजकांना ७/१२ उतारा तसेच ९(३), ९(४) नोंदी ऑनलाईन पद्धतीने प्राप्त करून अर्ज प्रक्रियेत वेळेवर सादर करण्याचेही प्रशिक्षण यावेळी देण्यात आले.

वाडा इंडस्ट्रियल असोसिएशनचे उपाध्यक्ष मिलिंद वाडेकर यांनी जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार मानले.

जिल्ह्यात ९८ हजार लाडक्या बहिणींना मिळणार मोफत साडी

रास्त भाव दुकानांमधून होणार वाटप

गणेश पाटील

पालघर : जिल्ह्यात अंत्योदय योजनेच्या माध्यमातून मोफत धान्याचा लाभ मिळत असलेल्या कुटुंबाला धान्यासोबतच एक साडी सुद्धा मोफत मिळणार आहे. पालघर जिल्ह्यात ९७ हजार ८९७ कुटुंबांना मे मध्ये मोफत साडी वितरित केली जाणार आहे.

राज्याच्या सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत कॅन्टीव्ह मार्केट योजना गेल्या दोन वर्षांपासून राबविण्यात येत आहे. जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून ज्या गरीब लाभार्थ्यांना अंत्योदय योजनेचा धान्य पुरवठा केला जातो अशा लाभार्थ्यांच्या कुटुंबात रामनवमीपासून एका साडीचे वितरण करण्यासाठी ही योजना आहे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ या संस्थेला योजनेच्या यशस्वितेसाठी नोडल संस्था म्हणून नेमण्यात आले आहे. योजनेच्या पहिल्याच वर्षी साडी वाटप केल्यानंतर काही साड्या फाटक्या निघाल्याची तक्रार लाभार्थ्यांकडून करण्यात आली होती. परिणामी लाभार्थी कुटुंबांना साड्याचे वितरण करताना सर्व साड्या सुस्थितीत असल्याची खात्री करण्यात यावी त्याचप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत फाटक्या साडीचे वितरण करण्यात येऊ नये असे स्पष्ट आदेशच यावेळी देण्यात आले आहेत. तसेच साड्यांची हाताळणी आणि साठा करताना कुठल्याही परिस्थितीत साड्या खराब होणार नाहीत याची दक्षता घेण्याचे निर्देश सुद्धा देण्यात आले आहेत. अंत्योदय योजनेच्या एका कुटुंबात एक साडी कापडी पिशवीसह देणे आणि इपॉस मशीनवर त्याबाबत नोंद घेण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. दरम्यान मे महिन्याचे धान्य वितरण करताना साडीचे वाटप व्हावे याकरिता पुरवठा विभागाने नियोजन केले आहे. यंत्रमाग महामंडळाकडून पालघर जिल्ह्यासाठी ९७ हजार ८९७ साड्या मिळणार आहेत.

> पालघर जिल्ह्यातील अंत्योदय योजनेच्या कुटुंबासाठी मोफत साडी वितरित करण्याकरिता मंजुरी मिळाली आहे. साड्या उपलब्ध झाल्याबरोबर संबंधित कुटुंबांना रास्त भाव दुकानाच्या माध्यमातून साड्यांचे वाटप केले जाणार आहे.
> - सीमा महल्ले, प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय पालघर.

आश्रमशाळा अधीक्षकांचे जगणे झाले 'वेठबिगारी'सारखे

२४ तासांच्या ड्युटीमुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य धोक्यात!

◆ तलासरी (प्रतिनिधी) :

राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळेतील अधीक्षक आणि अधीक्षिका सध्या अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहेत. इतर शासकीय कर्मचाऱ्यांना निश्चित कामाचे तास असताना, आश्रमशाळा अधीक्षकांना मात्र २४ तास ड्युटी करावी लागत आहे. या अघोषित 'वेठबिगारी'मुळे अनेकांचे कौटुंबिक आयुष्य उद्ध्वस्त झाले असून, त्यांचे आरोग्यही धोक्यात आले असल्याचे गंभीर निवेदन अधीक्षक संघटनेने शासनाला दिले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, अधीक्षक हा आश्रमशाळेतील असा एकमेव घटक आहे जो २४ तास विद्यार्थ्यांच्या संपर्कात आणि शाळेत वास्तव्यास असतो. पोलीस, आरोग्य आणि अग्निशमन दल यांसारख्या अत्यावश्यक सेवांमध्येही कर्मचाऱ्यांना ८-८ तासांच्या तीन शिफ्टमध्ये काम दिले जाते. मात्र, आश्रमशाळा अधीक्षकांना सलग २४ तास कर्तव्यावर राहावे लागते. त्यांना कोणतीही शिफ्ट पद्धती लागू नाही. साप्ताहिक सुटी किंवा सार्वजनिक सुट्ट्यांचा लाभही त्यांना मिळत नाही. परिणामी, १० ते १५ वर्षांपासून सेवा बजावणाऱ्या अनेक अधीक्षकांना मधुमेह, रक्तदाब आणि हृदयविकारासारख्या गंभीर आजारांचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शासनाला दिलेल्या निवेदनातील प्रमुख मागण्या :

१) अधीक्षक संवर्गासाठी कार्यालयीन कामाचे तास (शिफ्ट ड्युटी) तातडीने निश्चित करावेत.

२) या पदाचा समावेश 'अत्यावश्यक सेवा' क्षेत्रात करून त्याप्रमाणे सुविधा द्याव्यात.

३) २०० पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या शाळांमध्ये सहायक अधीक्षकांच्या पदाऐवजी आश्रमशाळेवर विद्यार्थी संख्येची अट न घालता समकक्ष अधीक्षक व अधिक्षिका पद त्वरीत भरावे.

४) अधीक्षकांनाही पाच दिवसांचा आठवडा लागू करावा किंवा त्याबदल्यात अतिरिक्त मोबदला द्यावा. या निवेदनामुळे आता आदिवासी विकास विभाग काय भूमिका घेते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

या निवेदनामुळे आता आदिवासी विकास विभाग काय भूमिका घेते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

UJJIVAN

नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सा मान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव **"जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर"** खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

अनु. क्र.	कर्ज खाते क्र./ शाखा	कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव	१३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार	ताब्याचा दिनांक	राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआर मध्ये
1	4462210130000072/ 4462- कामोठे	१. अमबुजनआभा संजीवा सालियन २. धीरज अमबुजनआभा सालियन, ३. ललीथा अमबुजनआभा सालियन सर्वांचा पत्ताः आशीर्वाद, चाळ-२, जरीमरी नगर, हनुमान टेकडी कोळसेवाडी, गाव कल्याण (पू) जिल्हा ठाणे राज्य महाराष्ट्र ४२१३०६	१६.१०.२०२३/ १३.१०.२०२३ अनुसार रु. १०,८८,०८६.४८	09.01.2026	Rs.1290000/- / Rs.129000/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन :येथील मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. २०४, २ रा मजला, ५०५ चौ. मी. बिल्टअप क्षेत्रफळ, माउली प्लाझा म्हणून ज्ञात इमारतीची ए विंग, गाव द्वारली,तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथील सर्व खंड आणि भूखंड. ज्याच्या मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः बांधकाम चालू असलेली मालमत्ता; पश्चिम – खुला प्लॉट, दक्षिण – अंतर्गत रोड, उत्तर- बांधकाम चालू असलेली मालमत्ता				
2	4420210130000436/ 4420- डोंबिवली	१.राहुल रघुनाथ शिदृक, २. सारिका राहुल शिदृक दोघे येथेः खोली क्र. १३, राजगड चाळ, महाराष्ट्र नगर, मानखुर्द (प), मुंबई महाराष्ट्र ४०००८८ दोघे येथे देखीलः शिदृकवाडी पोस्ट, कोरीवाले, पाटण, सातारा, महाराष्ट्र ४१५२०९, अनु. क्र. १ येथे देखीलः सागर रोडलाईन्स, ५३/५७, १५५ आजी स्ट्रीट, ओल्ड बर्डन लेन, युनायटेड चेम्बर्स, नागपूर गुडस जवळ, मस्जिद बंदर (प), मुंबई महाराष्ट्र४०००० ३	२७.१२.२०२४ २१.१२.२०२४ अनुसार रु. १७७२२४१.०१/-	09.01.2026	Rs.1320000/- / Rs.132000/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव नेरळ, जिल्हा आणि नोंदणीकरण जिल्हा रायगडमधील, रायगड जिल्हा परिषदेच्या हद्दीमधील तालुका कर्जत उप जिल्हा रायगड, कर्जत पंचायत समिती आणि नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ३९४, हिस्सा क्र. १ सर्वे क्र. ३९५ हिस्सा क्र. ३ वर बांधण्यात आलेल्या "ओम विला" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या ए विंग च्या तिसऱ्या मजल्यावरील ६०० चौ. फू. बिल्टअप क्षेत्रफळ असलेल्या सदनिकेचा धारण केलेला क्र. ३०१ चा सर्व खंड आणि भूखंड. मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः बंगला, पश्चिम : रोड, उत्तरः रोड, दक्षिणः रोड. **राहुल रघुनाथ शिदृक आणि सारिका राहुल शिदृक ह्यांच्या मालकीची**				
3	441621013000 0005/ 4416 कल्याण	१. साहेबराव छगन गायकवाड, २. श्रीमती मीरा साहेबराव गायकवाड दोघांचा पत्ताः येथे राहणारः घर क्र. ६६९, २६२, आंबेडकर नगर, ठाणे बेलापूर रोड, पोयषा कंपनी समोर, दिघा, नवी मुंबई ऐरोली महाराष्ट्र ४००७०८ दोघे येथे देखीलः सदनिका क्र. ११, २ रा मजला, सुंदरम कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (प्रस्तावित), "एकविरा कॉम्प्लेक्स" म्हणून ज्ञात कॉम्प्लेक्स, १५ सर्वे क्र. १६४ हिस्सा क्र. २+३/८, आणि सर्वे क्र. १६७, प्लॉट क्र.५ गाव नेरळ ता. कर्जत जिल्हा रायगड ४१०१०१	०५.१०.२०२३/ ०४.१०.२०२३ अनुसार रु. ९७६३४३.७५	04.02.2026	Rs.1390000/- / Rs.139000/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : महसुली गाव नेरळ, तालुका कर्जत जिल्हा रायगड येथे वसलेल्या सर्वे क्र. १६४ हिस्सा क्र. २+३/८, आणि सर्वे क्र. १६७, प्लॉट क्र.५ वरील "एकविरा कॉम्प्लेक्स" म्हणून ज्ञात असलेल्या सुंदरम कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (प्रस्तावित) म्हणून ज्ञात इमारतीच्या २ च्या मजल्यावरील ६०५ चौ. फू. (बिल्टअप) क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ११ चा सर्व खंड आणि भूखंड. - उपरोक्त नमूद नावे असलेल्यांच्या मालकीचे.				
4	441621013000 0170/ 4416- कल्याण	१.विरल दिलीप शाह, २. दिलीपकुमार लिलाधर शाह, दोघांचा पत्ताः दोघे येथे राहणारः बी/ २०६, न्यू फोरम सीएचएस, गुप्ते रोड, जय हिंद कॉलनी डोंबिवली पश्चिम, कल्याण विष्णूनगर, ठाणे, महाराष्ट्र ४२१२०२. दोघे येथे देखीलः सदनिका क्र. १०४, पहिला मजला, "स्वामी प्रतिमा" म्हणून ज्ञात असलेली इमारत, नवीन सर्वे क्र. ८६/५०, ८६/५१, ८६/५२, (जुना सर्वे क्र. २८/२, +३१/२+३२/२+७६/१८ प्लॉट क्र. एसओ ५१, ५२ पैकी), गाव धामोटे, ग्रामपंचायत कोल्हारे नेरळ पूर्व, तालुका कर्जत, जिल्हा रायगड ४१०१०१	०९.११.२०२३ / ०४.११.२०२३ अनुसार रु. ४३०३२१९.०६	06.02.2026	Rs.1815000/- / Rs.181500/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव धामोटे, ता. कर्जत, जिल्हा रायगड ग्रामपंचायत कोल्हारे ह्यांच्या हद्दीमध्ये वसलेल्या नवीन सर्वे क्र. ८६/५०, ८६/५१, ८६/५२, (जुना सर्वे क्र. २८/२, +३१/२+३२/२+७६/१८ प्लॉट क्र. ५०, ५१, ५२ पैकी) स्वामी प्रतिमा म्हणून ज्ञात इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील ५६ चौ. फू. खुल्या गच्चीसह ४२५ चौ. फू. (चटई क्षेत्र) असलेली सदनिका क्र. १०४. सीमा पुढील प्रमाणेः पूर्वः प्लॉट क्र. ४९, पश्चिमः गुरचरण, उत्तरः अंतर्गत रोड, दक्षिणः गार्डन. नमूद मालमत्ता एसआरओ कर्जत २ ह्यांच्याकडील विक्री करार क्र. २९१९/ २०१९ दि. ०७/०६/२०१९ अनुसार **विरल दिलीप शाह आणि दिलीपकुमार लीलाधर शाह ह्यांच्या मालकीची.**				
5	441121011000001 01/ 4411- कोपरखैरणे	१.महादेव भगवान कदम, २. संगीता महादेव कदम दोघांचा पत्ताः घर क्र. १०, ज्योतिलिंग नगर, मानखुर्द, सोनापूर, मुंबई महाराष्ट्र ४०००४३. अनु. क्र. १ येथे देखीलः खोली क्र. ३ जयहिंद नगर, सोनापूर संतोषी माता मंदिरामागे, मानखुर्द, मुंबई महाराष्ट्र ४०००४३	१८.०१.२०२४/ १५.०१.२०२४ अनुसार रु. ५०१६८७.१७	07.02.2026	Rs.680000/- / Rs.68000/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव पाले बुद्रुक, तालुका – पनवेल जिल्हा रायगड, ग्रुप ग्रामपंचायत पाले बुद्रुक येथे वसलेल्या घर क्र. २३३, २३३ ए आणि २३३ बी वर बांधण्यात आलेल्या "इंद्र प्रस्थ" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील २५० चौ. फू. बिल्ट अप क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. २३३/ए/१०९ मालमत्तेच्या सीमा पुढील प्रमाणेः उत्तरः खुली जागा, दक्षिणः खुली जागा, पूर्वः इमारत क्र ०२, पश्चिमः खुली जागा. **संगीता महादेव कदम आणि महादेव भगवान कदम ह्यांच्या मालकीची.**				
6	441121005000000 06/ 4411- कोपरखैरणे	१. भगवान मारुती आवळे, २. विद्या भगवान आवळे दोघांचा पत्ताः रमा मारुती खोली क्र. ००१, विठ्ठल मंदिराजवळ, कल्याण पूर्व, ठाणे महाराष्ट्र – ४२१२०४. दोघे येथे देखीलः खोली क्र. २, कस्त्री कॉलनी, बदलापूर रोड, मंगरूळ गाव, कल्याण फालेगाव, ठाणे महाराष्ट्र ४२१३०१, अनु. क्र. १ येथे देखीलः जागृतीज हायड्रो सर्व्हिसेस, प्लॉट क्र. १३११, स्टील चेंबर कळंबोली, पनवेल, नवी मुंबई महाराष्ट्र ४१०२१८. अनु. क्र. १ येथे देखीलः ओम पब्लिक स्कूल, निळजे गाव, निळजे रेल्वे स्टेशन कल्याण, जिल्हा ठाणे महाराष्ट्र ४२१२०४.	२०.०५.२०२४/ १७.०५.२०२४ अनुसार रु. १२८३७६८.१८	12.02.2026	Rs.1392000/- / Rs.139200/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : ग्रामपंचायत रोहिनजन च्या हद्दीमधील गाव रोहिनजन, ता. पनवेल, जिल्हा रायगड येथे असलेल्या वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. २४ ए हिस्सा क्र. ०. १६/१ वरील "साईराज रेसिडन्सी" म्हणून ज्ञात इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील ३७७ चौ. फू. मोजमाप असलेली सदनिका क्र. १०२. सीमा पुढील प्रमाणेः पूर्वः घर, पश्चिमः पार्किंग, दक्षिणः घर, उत्तरः रोड. **भगवान मारुती आवळे आणि विद्या भगवान आवळे ह्यांच्या मालकीचे.**				
7	441121017000010 6/ 4411- कोपरखैरणे	१.गणेश सदाशिव सूर्यवंशी, २. सुषमा सूर्यवंशी दोघांचा पत्ताः १ ला मजला, खोली क्र. ४, हिल व्यू पार्क, चिंचवली रोड, सरस्वती नगर, खोपोली रायगड, महाराष्ट्र ४१०२०३. अनु. क्र. १ येथे देखीलः पंचायत समिती खालापूर, स्वामी विवेकानंद शाळे जवळ, मुंबई पुणे एक्सप्रेस वे, रायगड महाराष्ट्र ४१०२०२	०९.०१.२०२४/ ०८.०१.२०२४ अनुसार रु. १५७२३६४८६	13.02.2026	Rs.1428000/- / Rs.142800/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : सदनिका क्र. ३०८, ३ रा मजला, आर्या रेसिडन्सी म्हणून ज्ञात इमारत, ४२७ चौ. फू. चटई क्षेत्र, धारण केलेला घर क्र. २३६(३०८), गाव पाले बुद्रुक, ता. पनवेल जिल्हा रायगड				
8	441121013000057 0/ 4411- कोपरखैरणे	१. अरुण मुकुंदन मेनन, २. स्नेहल मेनन दोघांचा पत्ताः प्लॉट क्र. ०३, रोड क्र. १६, बीएसएनएल ऑफिस समोर, सेक्टर १२, नवीन पनवेल, रायगड, महाराष्ट्र ४१०२०६. अनु. क्र. २ येथे देखीलः इंडो स्कॉटस ग्लोबल स्कूल, प्लॉट क्र. १५, सेक्टर १७, मानसरोवर रेल्वे स्टेशन, कामोठे, नवी मुंबई महाराष्ट्र ४१०२०६	१०.०५.२०२४/ ०६.०५.२०२४ अनुसार रु. १८५४६२८.५८	14.02.2026	Rs.1242500/- / Rs.124250/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव आकुर्ली, ता. पनवेल जिल्हा रायगडमध्ये असलेल्या आणि वसलेल्या जमिनीचा धारण केलेला द्विवेलिंग घर क्र. ३७९ "श्री कल्पेश्वर" म्हणून ज्ञात असलेल्या प्रकल्पाच्या दुसरा मजल्यावरील ४४१ चौ. फू. चटई क्षेत्रफळ असलेला सदनिका क्र. २०३.जे **अरुण मुकुंदन मेनन आणि स्नेहल मेनन ह्यांच्या मालकीचे असलेले.**				
9	4416210180000043/ 4416- कल्याण	१. देवेंद्र चंद्रकांत भोईर २. जयमाला देवेंद्र भोईर दोघांचा पत्ताः घर क्र. १३४/ बी, अग्निमाता मंदिरामागे, आग्रीवाडा, कशेळी – काल्हेर, भिवंडी, ठाणे ४२१३०२. अनु. क्र. १ येथे देखीलः श्री साई एन्टरप्रायझेस, खोली क्र. ०५, प्रथमेश अपार्टमेंट, कशेळी पोस्ट, अग्निमाता मंदिरा मागे, काल्हेर, भिवंडी, ठाणे ४२१३०२	०६.०९.२०२४/ २९.०८.२०२४ अनुसार रु १०८७७६३.२९	16.02.2026	Rs.1388000/- / Rs.138800/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : ग्रामपंचायत गाव कशेळी, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे ४२१३०२ च्या हद्दीमधील अग्निमाता मंदिराच्या मागे, आग्रीवाडा येथील ४०८ चौ. फू. मोजमाप असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला आरसीसी घर क्र. १३४/बी.सीमा पुढील प्रमाणेः पूर्वः विग हाऊस अपार्टमेंट, पश्चिम श्री कृष्ण अपार्टमेंट, दक्षिणः सुनील जी. भोईर ह्यांचे घर, उत्तरः श्री. महादेव के. भोईर ह्यांचे घर. देवेंद्र चंद्रकांत भोईर ह्यांच्या मालकीचे.				
10	4462210130000008/ 4411- कोपरखैरणे	१.संतोष मोहन जगताप, २. श्रीमती मनीषा संतोष जगताप दोघांचा पत्ताः खोली क्र. ०१, फर्नांडिस चाळ, न्यू मिल रोड, रामदास चौक, कुर्ला, मुंबई महाराष्ट्र ४०००७० दोघे येथे देखीलः खोली क्र. ३/२४२, भवानी चौक, भालेकर वाडी, न्यू मिल रोड, कुर्ला, मुंबई, महाराष्ट्र ४०००७०. अनु. क्र. १ येथे देखीलः एएफएम, १ ला मजला, एमबीसी सेंटर, घोडबंदर रोड, कापुरबावडी ठाणे, महाराष्ट्र ४००६०७	१८.०१.२०२४/ १५.०१.२०२४ अनुसार रु. ३०९३७९.३९	20.02.2026	Rs.696200/- / Rs.69620/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : ग्राम पंचायत आदीच्या हद्दीमधील गाव आदी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे वसलेल्या ग्राम पंचायत घर क्र. ६२७ आणि ६२८ वर बांधण्यात आलेल्या "साई सदन" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील १९५ चौ. फू. मोजमाप असलेली सदनिका क्र. ११०. संतोष मोहन जगताप आणि मनीषा संतोष जगताप ह्यांच्या मालकीची				
11	4462210130000075/ 4462- कामोठे	१. मोहम्मद रईसइद्रीश शेख, २. मीना बाबदिन पासी, दोघे येथे देखील : सदनिका क्र. २०४, लक्ष्मी वृंद, गुडविल सोसायटी जवळ, काल्हेर भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२. अनु. क्र. १ येथे देखीलः एकविरा कीज, गाळा क्र. १, साई दर्शन अपार्टमेंट, काल्हेर भिवंडी, ठाणे ४२१३०२ आणि खोली क्र. १०३, १ ला मजला, सी विंग, गुडविल सोसायटी जवळ, काल्हेर भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२ अनु. क्र. २ येथे देखीलः खोली क्र. १४८२, रोड क्र. २१, सेन्ट्रल एक्साईज बिल्डींग मागे, नेहरू नगर क्र. २, वागळे इस्टेट, ठाणे – महाराष्ट्र ४००६०४	०६.०९.२०२४/ ०३.०९.२०२४ अनुसार रु. ११३२०१७/-	09.03.2026	Rs.1265000/- / Rs.126500/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : ग्राम पंचायत काल्हेर, गाव काल्हेर, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे ह्यांच्या हद्दीमध्ये वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ७१, हिसा क्र. ४/८ वर बांधण्यात आलेल्या "लक्ष्मी वृंद" म्हणून ज्ञात आरसीसी इमारतीच्या २ च्या मजल्यावरील ४२५ चौ फू. बिल्टअप क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. २०४. पूर्वःबंगलो, पश्चिम अंतर्गत रस्ता, दक्षिणः अंतर्गत रस्ता उत्तरः गुडविल इमारत **मोहम्मद रईसइद्रीश शेख ह्यांच्या मालकीचे**				
12	4505210130000223/ 4505- विरार	अजय रवींद्र यादव, २ . रवींद्र यादव, ३. रामवती रवींद्र यादव, सर्वांचा पत्ताः जे १३ नेहरू नगर, उत्तन, भाईंदर रोड, पोलीस स्टेशन मागे, भाईंदर पश्चिम, ठाणे महाराष्ट्र ४०११०१. अनु. क्र. १ येथे देखीलः सी/ओ प्रियांका एस. गुप्ता, जी १७, लाल बहादुर शास्त्री नगर, स्टेशन रोड, पोलीस स्टेशन मागे, गल्ली क्र. ३, भाईंदर पश्चिम, ठाणे महाराष्ट्र ४०११०१. आणि झी सिस्टेक प्रायव्हेट लिमिटेड, ७ पाली व्हिलेज, वांद्रा १६ रोड, वांद्रा (पश्चिम), मुंबई महाराष्ट्र ४०००५०. अनु. क्र. २ येथे देखीलः खोली क्र. १५, लाल बहादुर शास्त्री नगर, गल्ली क्र. ३, भाईंदर पश्चिम, ठाणे महाराष्ट्र ४०११०१. आणि इम्पॅक्ट शिरीन बी शाह निशा ऑप्टिकल इंडस्ट्रीज, महावीर नगर, स्टेशन रोड, भाईंदर पश्चिम महाराष्ट्र ४०११०१. अनु. क्र. ३ येथे देखीलः लालबहादूर शास्त्री नगर, खोली क्र. १७, उत्तन रोड, पोलीस स्टेशन मागे, गल्ली क्र. ३ ठाणे महाराष्ट्र ४०११०१	२५.१०.२०२३ १९.१०.२०२३ अनुसार रु. १२७७२०१.८९	28.03.2026	Rs.1450000/- / Rs.145000/-
स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव गोखीवरे, तालुका वसई पूर्व जिल्हा पालघर येथे वसलेल्या आणि असलेल्या भार मुक्त जमिनीचा धारण केलेला घर क्र. ७३६७, सर्वे क्र. १० गावठाण गाव मधील जमिनीचे क्षेत्रः ०-४३-३ एच.आर.पी., ०-०३-३ पी. केएच. एच.आर.पी. वर बांधण्यात आलेल्या "शांती पार्क" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या ए विंग च्या पहिल्या मजल्यावरील ३५० चौ. फू. (बिल्टअप/ चटई क्षेत्र) असलेल्या सदनिका क्र. १०१ चा सर्व खंड आणि भूखंड. अजय र